# जिल्हा व सत्र न्यायालय, वाशिम
# जाहीर प्रगटन
# दिनांक १३/०५/२०२४

जिल्हा व सत्र न्यायालय, वाशिम, जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, मंगरुळपीर, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, वाशिम, मुख्य न्यायदंडाधिकारी वाशिम, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, मंगरुळपीर, दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, कारंजा, दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, मानोरा, दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, रिसोड व दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, मालेगांव या न्यायालयांकरीता प्रत्येकी एक असे एकुण नऊ (०९) फोटोकॉपी यंत्र भाडेतत्वावर घेण्यासाठी मोहरबंद दरपत्रके मागविणेबाबत.

०१. प्रत्येक निविदाकारास फक्त एकच दरपत्रक देण्याची परवानगी असेल.

०२. या कार्यालयाच्या फायद्याच्या दृष्टीने सर्वात कमी किंमतीचे दरपत्रकास मंजुरी देण्यात येईल.

०३. फोटोकॉपी यंत्र भाडेतत्वावर देणा-या निविदाकाराला अधिकृत निविदाकार यांनी लेटर हेडवर दरपत्रक जीएसटी कमांकासह सादर करणे बंधनकारक राहील.

०४. निविदाकाराला दरपत्रकासोबत निविदाकाराचे आधारकार्ड व पॅनकार्डची छायांकित प्रत सादर करणे बंधनकारक राहील.

०५. दरपत्रकामध्ये सर्व प्रकारच्या खर्चाचा/चार्जेसचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

०६. दरपत्रक सादर करणा-या निविदाकाराचा अथवा त्याच्या प्रतिनिधीचा या कार्यालयाबरोबर कोणताही हितसंबंध नसावा याची नोंद घ्यावी.

०७. दरपत्रक सादर करतांना त्यामध्ये संदर्भाचा उल्लेख करणे बंधनकारक आहे व राहिल.

०८. वाशिम येथे तीन, मंगरुळपीर येथे दोन व मानोरा, कारंजा, रिसोड व मालेगांव येथे प्रत्येकी एक याप्रमाणे नविन नऊ फोटोकॉपी यंत्र भाडेतत्वावर देणे संबंधाने आपण आपल्या कंपनीच्या सर्व नियम व अटींचा उल्लेख करुन सिलबंद पाकिट या कार्यालयास वेळेत सादर करण्यात याव्या.

०९. सदरचा वार्षिक सेवा संविदा करार हा बॉन्डवर टंकलिखीत, करार करुन घेणार, करार करुन देणार व मा. न्यायालयाने नेमलेल्या साक्षीदारांच्या स्वाक्षरीने करण्यात येईल.

१०. उपरोक्तप्रमाणे मोहोरबंद पाकिटे **दिनांक १०/०६/२०२४** रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत या कार्यालयात स्विकारण्यात येतील. त्यानंतर प्राप्त होणारी दरपत्रके विचारात घेतली जाणार नाही.

११. सदरील दरपत्रकाचे मोहोरबंद पाकिट मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम यांचे नावे पाठविण्यात यावे व त्यावर फोटोकॉपी यंत्र भाडेतत्वावर देण्याकरीता दरपत्रक असा स्पष्ट उल्लेख करावा.

१२. वार्षिक सेवा संविदा करणेकामी फोटोकॉपी यंत्र दुरुस्तीकार/विकेते कंपनी/ एजन्सी यांना ज्या तारखेपासून करार करण्यात येईल त्यापुढे ०१ वर्षे कालावधी करीता सेवा पुरविणे संदर्भात खालील अटी व शर्ती लागु राहतील.

**अ.** कराराच्या कालावधीमध्ये संबंधीत न्यायालयास वेळोवेळी सेवा पुरविणे बंधनकारक राहिल.

**ब.** फोटोकॉपी यंत्र हे पुर्ण क्षमतेने कार्य करणारे तसेच त्यामध्ये लॅन कनेक्शन, यु.एस. बी. कनेक्शन तसेच डि.ए.डि.एफ.वाय प्रणाली असे पुर्ण सुविधायुक्त यंत्र असावे. फोटोकॉपी यंत्राचे नादुरुस्त भाग स्वखर्चाने वेळेत दुरुस्त करणे किंवा त्याठिकाणी नविन भागाची व्यवस्था करणे बंधनकारक राहील.

**क.** नादुरुस्त फोटोकॉपी यंत्र दुरुस्त होणार नसल्यास किंवा दुरुस्त करण्यास विलंब होणार असल्यास त्याठिकाणी स्टॅण्डबाय म्हणुन २४ तासाच्या आत दुसरे चालु स्थितीतील फोटोकॉपी यंत्र उपलब्ध करुन देणे निविदाकारास बंधनकारक राहील.

**ड.** फोटोकॉपी यंत्रासंबंधीचे अत्यावश्यक असलेले टोनर मागणीनुसार वेळेत पुरविणे निविदाकारास बंधनकारक राहील.

**इ.** या कार्यालयामार्फत वेळोवेळी फोटोकॉपी यंत्रासंबंधीच्या देयके, तकारी, संबंधाने करण्यात येणारा पत्रव्यवहार दुरध्वनी/भ्रमणध्वणीच्या माध्यमातुन कळविण्यात येणा-या अडचणींचे निवारण करणे निविदाकारास बंधनकारक राहील.

१३. मोहोरबंद पाकिटे ही जिल्हा न्यायालय, वाशिम खरेदी समिती यांचे समक्ष **दिनांक ११/०६/२०२४** रोजी सायंकाळी ०५.४५ वाजता मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम यांचे निजी कक्षात उघडण्यात येतील. जर तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास दुस-या दिवशी ठरलेल्या वेळेत व ठिकाणी मोहोरबंद पाकिटे समितीपुढे उघडण्यात येतील.

१४. सदरील मोहोरबंद पाकिटे कोणतेही कारण नमुद न करता नाकारण्याचा तसेच सदरहु प्रकिया रद्द करण्याचा संपुर्ण अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम यांना राहिल.

आदेशान्वये,

प्र. प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, वाशिम.